# अहमदनगर जिल्हा परिषद
# आरोग्य विभाग

## योजना

१. कुटूंब कल्याण
२. माता-बाल संगोपन कार्यक्रम
३. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम
४. राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण कार्यक्रम
५. सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग  नियंत्रण कार्यक्रम
६. पल्स पोलिओ लसीकरण मोहिम
७. साथनियंत्रण व पाणी शुध्दीकरण संनियंत्रण
८. शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम
९. नवसंजीवनी योजना
१०.जिल्हा प्रशिक्षण संघ
११.शालेय एडस प्रतिबंधन कार्यक्रम
१२.शालेय एडस कार्यक्रम
१३.मातृत्व अनुदान योजना- (आदीवासी भाग)
१४.पाडा / आशा स्वयंसेवक योजना
१५.स्वयंसेवी संस्थांची माहिती
१६सुधारीत सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना
१७.किडणी, कॅन्सर व हृ-दयरोग अर्थिक मदत
१८.जननी सुरक्षा योजना
१९.तालुका आरोग्य अधिकारी कक्ष

## *कुटूंब कल्याण:-*

सन २००० मध्ये राज्य लोकसंख्या धोरण जाहीर करण्यात आले. लोकसंख्या नियत्रणासाठीच्या उपाययोजना राबविणे.

१. पात्र जोडपी सर्वेक्षण, व मतपरिर्वनासाठी नियमित भेटी.

२. पुरुष व स्त्री शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन.

३. देण्यात येणारे लाभ-

अ. स्त्री शस्त्रक्रिया लाभार्थी रुपये २५०/- पुरुष शस्त्रक्रिया लाभार्थी रु ११००/-

ब. शस्त्रक्रियेशी निगडीत कारणाने लाभार्थीचा मृत्यू रु. २ लक्ष नुकसान भरपाई

क. दारिद्रय रेषे खालील जोडप्याने एक अथवा दोन मुलींवर शस्त्राक्रिया केल्यास **"सावित्रीबाई फुले कन्या कल्याण"** योजने अंतर्गत रुपये १० हजार चे बचत प्रमाणपत्र मुलीच्या नावे.

४. पाळणा लांबविणे- संतती प्रतिबंधक साधन तांबी बसविणे, गर्भनिरोधक तोंडाने घ्यावयाच्या गोळया व निरोध वाटप.

५. शस्त्रक्रियेनंतरचा पाठपुरावा-

TOP

## ➢ माता-बाल संगोपन कार्यक्रमः-

या कार्यक्रमाअंतर्गत जिल्हयातील प्रत्येक गावी लाभार्थीना सर्व आरोग्य सेवा देण्यासाठी निश्चित ठिकाणी, निश्चित दिवशी, निश्चित वेळी, आरोग्य सेवा सत्रे नियमित भरविली जातात. प्रत्येक गावी वाडीवस्तीवरही, आरोग्य सेवा सत्रे नियमित भरविली जातात आरोग्य सेवा सत्रामध्ये ६ राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत दिल्या जाणा-या सेवाही पुरविल्या जातात.उपकेंद्र मुख्यालयाच्या सत्रांना वैदयकिय अधिकारी स्वतः उपस्थित रहातात व मार्गदर्शन करतात.

TOP

## ➢ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमः-

राष्ट्रीय किटकजन्य रोग निंयत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हयात एकुण १५२२ गावामध्ये प्रत्येक वाडया वस्त्यावर २१५८ हिवताप रुग्ण शोधउपचार केंद्र डी डी सी कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत. जिल्हयात एकुण १७७४ कायमस्वरुपाची डासोत्पत्ती ठिकाणे असुन २०५४ हंगामी डासोत्पत्ती ठिकाणे आहेत. आरोग्य कर्मचारी प्रत्येक घरात भेट देवुन ताप आलेले रुग्णाचे रक्तनमुने गोळा करतात. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आलेल्या ताप रुग्णांचे नमुने घेतले जातात. तापाची साथ उदभवल्यास सामुहिक सर्वेक्षण करुन तेथील लोकांचे रक्तनमुने गोळा केले जातात.

TOP

## ➢ राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण कार्यक्रमः-

आरोग्य कर्मचारी व कुष्ठरोग तंत्रज्ञामार्फत संशयीत कुष्टरोगी शोधून त्याची निदानात्मक चाचणी करण्यात येते.कुष्टरोग निदान झाल्यावर बहुविध औषधोपचार पध्दतीने उपचारात नियमितता राखून रूग्णास त्याचे घरपोच औषधोपचार केला जातो.ही सुविधा सर्व प्रा.आ.केंद्रात उपलब्ध आहे. कुष्टरोग शोध व उपचार विशेष मोहिमेचे जिल्हास्तरावरील वैदयकिय अधिकारी व कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आले.

TOP

## ➢ सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग  नियंत्रण कार्यक्रमः-

सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटीची स्थापना दि.२४/३/२००१ रोजी करण्यात आली. या कार्यक्रमा अंतर्गत क्षयरोग्यांना उपचार करण्यासाठी खालील केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

लोकसंख्या- ४४५८११९  शहरी- ८५१४६६ ग्रामीण- ३३०८५१५ आदिवासी- २९८१३८

क्षयरोग उपचार पथक- एकुण- ९ (अहमदनगर,कर्जत,नेवासा,पारनेर,पाथर्डी,राहाता,श्रीरापूर,संगमनेर,अकोले)

| | |
|---|---|
| सुक्ष्मदर्शक सेंटर- एकुण ४४ | प्राथमिक आरोग्य केंद्र- ९६ |
| ग्रामीण रुग्णालय- २० | जिल्हा रुग्णालय- ०१ |
| डॉट सेंटर- १८१३ | स्वंयसेवी संस्था- (एन.जी.ओ.)- ११ |

या कार्यक्रमामध्ये खालील कर्मचारी काम करीत आहेत.

क्षयरोग उपचार पर्यवेक्षक (एस टी एस) - एकुण- ९

क्षयरोग उपचार प्रयोगशाळा पर्यवेक्षक (एस टी एल एस)- एकुण- ९

क्षयरोग हेल्थ व्हिझीटर- ८

प्रयोगशाळा तंत्रज्ञ (एल टी)- ४

TOP

## ➢ पल्स पोलिओ लसीकरण मोहिमः-

अहमदनगर जिल्हयामध्ये प्रत्येक वर्षी पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येते. त्यामध्ये ० ते ५ वयोगटातील लाभार्थीना पोलिओचे जादा डोस देण्यात येतात.

शहरी भागातील झोपडपटटी मध्ये व ग्रामिण विभागातील भटके लोक, उसतोड कामगार, विटभटया कामगार, यांचे बालकांना घरोघरी जाउन पोलिओचे जादा डोसेस देण्यात येतात.

TOP

## ➢ साथनियंत्रण व पाणी शुध्दीकरण संनियंत्रणः-

जलजन्य आजाराचा साथ उद्रेक होउ नये म्हणून ग्रामिण भागात पाणी शुध्दीकरणाचे काम नियमित करणे महत्वाचे असल्याने ग्रामपंचायतमार्फत पाणी शुध्दीकरणाचे काम करण्यात येते.प्रत्येक गावी परिणामकारक पाणी शुध्दीकरणाचे काम करण्यासाठी स्थानीक व्यक्तीची निवड करण्यात येउन त्या व्यक्तिस पाणी शुध्दीकरणाचे तांत्रीक प्रशिक्षण प्रा.आ.केंद्रामार्फत दिले जाते. व त्यास जबाबदार व्यक्ति म्हणून ग्रामपंचायत मार्फत नियुक्ती केली जाते.पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता  व त्याबाबत संनियंत्रण राखुन पाणी शध्दीकरणाचे काम नियमित व परिणामकारक होत आहे का या कामाची देखभाल आरोग्य विभागामार्फत ओ.टी.परीक्षणादवारे व नियमित पाणी नमुने घेउन करण्यात येते.तांत्रीक दोष ,नळ गळती ,टी.सी.एल नसणे ,पाणी शुध्दीकरणाचे काम नियमित न करणे, परीसर अस्वच्छता  इ.बाबतीत ग्रामपंचायतींना सुचना देउन त्याची पुर्तता करून घेण्यात येते.

दरवर्षी माहे मे /जुन व डिसेंबर /जानेवारी या महिण्यातआरोग्य विभागाकडून ग्रामिण भागातील सर्व पाण्याच्या उदभवाचे सर्वेक्षण करण्यात येते.सुरक्षीत पाणी पुरवठा करणाऱ्याग्रामपंचायतींना हिरवे कार्ड  व असुरक्षीत पाणी पुरवठा करणाऱ्या ग्रामपंचायतींना लाल कार्डदेण्यात येते.पाणी शुध्दीकरणासाठी लागणा-या ब्लिचिंग पावडरची गुणवत्ता राखण्याकरिता ब्लिचिंग पावडरचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेकडे पाठविले जातात.जिल्हास्तरावर व प्रा. आ.केंद्रस्तरावर पावसाळयाकरिता स्वतंत्र साथनियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात येत असते.

मा.महासंचालक आरोग्य सेवा मुंबई यांनी त्यांचे २१.१.२००१ चे पत्रान्वये भारत देश नारू मुक्त झाल्याचे कळविले आहे.अहमदनगर जिल्हयामध्ये
मे ८७ पासून नारू रूग्ण आढळून आलेला नाही.

महाराष्ट्र आरोग्य विकास कार्यक्रमाअंतर्गत साथरोग सर्वेक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून जिल्हयातील सर्व वैदयकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे साथविषयक प्रशिक्षण पुर्ण करण्यात आले आहे .जिल्हयास्तरावर शिघ्र प्रतिसाद पथक स्थापन करण्यात आले असून प्रत्येक साथउद्रेकाचे विश्लेशन करून आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

TOP

## ➢ शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमः-

सन २००५-०६ या वर्षामध्ये दिनांक १७/०१/२००६ ते ३१/०१/२००६ या कालावधीमध्ये शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. जिल्हयात एकुण ३३१५ प्राथमिक शाळा व ५४ आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करण्यात आली.

जिल्हयात एकुण अपेक्षीत विद्यार्थी ३३७०७३ असुन शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा अहवाल प्राथमिक आरोग्य केंद्राकडुन अद्याप अप्राप्त.

TOP

## ➢ नवसंजीवनी योजना.

जिल्हयातील अकोला, संगमनेर या भागातील १३१ अदिवासी गावामध्ये ही योजना शासनाच्या नवसंजीवनी योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येत असून या अंतर्गत प्रत्येक गरोदर मातेची, स्तनदा मातेची तसेच अंगणवाडीतील आणि इतर बालकांची वैदयकिय तपासणी करण्यात येते.व उपचार केले जातात.आढळून आलेल्या कुपोषीत बालकांना योग्य सल्ला व औषधोपचार तसेच सर्व आरोग्य सुविधा १० प्रा.आ.केंद्र, ७० उपकेंद्र, ५ प्रा.आ.पथके व ३ ग्रामिण रूग्णालयाकडून दिल्या जातात.

साथ नियंत्रण व पाणी शुदधीकरण करण्याचे कामही केले जाते बालमृत्यू व मातामृत्यू प्रमाण कमी करण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जातात.

आदीवासी भागात दरवर्षी ६६ ठिकाणी सर्वरोग निदान शिबीरे आयोजित करून रूग्णांची तपासणी करून त्यांना औषधोपचार व शल्यचिकित्सा आवश्यक असणा-या रूग्णांना पुढील संदर्भ सेवेसाठी ग्रामिण रूग्णालयाकडे पाठविण्यात येते.

TOP

## ➢ जिल्हा प्रशिक्षण संघ.

अहमदनगर येथे सुसज्ज इमारतीमध्ये आरोग्य विभागाचे जिल्हा प्रशिक्षण संघ कार्यरत असून तेथे सर्व आरोग्य कर्मचा-यांना आरोग्य विभागाच्या सर्व कार्यक्रमाचे गुणात्मक कार्यवाहीचे दृष्ठीने प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये कर्मचा-यांच्या ज्ञानात व कौशल्यात भर पडून आरोग्य कार्यक्रम यशस्विपणे व परिणामकारकरित्या राबविले जातात. सन २००५-२००६ मध्ये प्रशिक्षण संघामध्ये खालील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

१.एक ात्मिक कौशल्य विकास प्रशिक्षण.
२.विशेष कौशल्य प्रशिक्षण
३.प्रजनन बाल आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत जनजागरण प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे.
४.क्षयरोग कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण प्रर्ण झाले आहे.
५.कुष्ठरोग कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.
६साथरोग सर्वेक्षण प्रशिक्षण
७. शालेय जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम (एडस.)
आर सी एच प्रशिक्षण लेप्रोस्कोपीक, मिनी लेप्रोस्कोपीक व इतर प्रशिक्षणा बाबत आहे.

TOP

## ➢ शालेय एडस प्रतिबंधन कार्यक्रम.

१.या कार्यक्रमाअंतर्गत २०००-२००१ मध्ये जिल्हयात एकूण ६० शाळांची निवड करण्यात आली .त्याच ६०शाळांची निवड व आणखी ३० शाळूंची  अश्या एकूण ९० शाळांची निवड २००१-२००२ मध्ये करण्यात आली.

२.दि.१९.१२.२००० रोजी जिल्हास्तरावर मुख्याध्यापकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

३.२००२-२००३ मध्ये जिल्हास्तरावर शिक्षकांसाठी ३ प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली होती.त्यामध्ये ५५ शाळामधील १०२ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.वरील ५५ शाळामध्ये शिक्षकांनी  इ.८ वी ते १० वी च्या विदयार्थ्यांना एडस् बाबत माहिती दिली व शाळांमधून निबंध स्पर्धा ,वक्तृत्व स्पर्धा,पथनाटय ,पालक मेळावा आयोजित करून एडस् बाबत माहिती दिली.२००३-२००४ या वर्षातही ६० शाळातील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

TOP

## शालेय एडस कार्यक्रमः-

शालेय एडस कार्यक्रमांतर्गत सन २००५-०६ मध्ये

- मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समन्वय सभा आयोजीत करण्यात आली सदर सभेत एडस प्रशिक्षण कार्यक्रमासाठी एकुण ५१ शाळेची निवड करण्यात आली (सर्व नगर तालुका)
- एकुण ४६ शाळेच्या मुख्याध्यापकांचे संवेदनीकरण प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले
- १०० नोडल टिचर्स जिल्हा स्तरावर प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले.
- ५१ शाळेतील विद्यार्थ्याचे (एडस विषयी जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम चालु आहे.)

**TOP**

♦ **मातृत्व अनुदान योजना-** (आदीवासी भाग)

नव संजीवनी योजने अंतर्गत गर्भवती मातेला संवेदनशील कालावधीमध्ये प्रसुतीपूर्व नोंदणी, आरोग्य तपासणी, औषधोपचार यासाठी गर्भवती महिलेस रुपये ४००/- रोख व रुपये ४००/- ची औषधे देण्यात येतात.रुपये ४००/- रोख पुढील प्रमाणे टप्प्याटप्प्याने देण्यात येतात.

१- गरोदरपणाच्या १६ आठवडयात नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात नोंदणी केल्यास रुपये १००/-
२- गरोदपणाच्या सातव्या महिण्यात रुपये १००/-
३- गरोदपणाच्या नवव्या महिन्यात रुपये १००/-
४- प्रसुती झाल्या नंतर लगेच रुपये १००/-

**TOP**

**♦ पाडा / आशा स्वयंसेवक योजना-**

पाणी शुद्धी करण व साथरोगाची वेळीच वर्दी देण्यासाठी पाडा स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत. जून ते डिसेंबर कालावधीत ८ महिन्यां करिता दरमहा रुपये ३००/- मानधन देण्यात येते ६०० लोकसंख्येला १ पाडा स्वयंसेवक नेमण्यात येतो ही योजना फक्त आदिवासी भागासाठी आहे.

दवाखान्यात भरती ग्रेड ३ व ग्रेड ४ चे बालरुग्ण व त्यासोबतच्या एका नातेवाईकास दोन्ही वेळेचे जेवण व त्यांच्या बुडीत मंजुरी पोटी रुपये ४०/- बालक दवाखान्यात असे पर्यत चालू राहिल ( आदीवासी भाग)

**TOP**

♦ **स्वयंसेवी संस्थांची माहिती:-**

जिल्हयामध्ये प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी ही संस्था प्रजनन आणि बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत मदर एनजीओ म्हणुन जिल्हयात कार्यरत आहे, सदर संस्थेच्या अधिनस्त एफ.एन.जी.ओ. अंतर्गत एकुण ११ स्वयंसेवी संस्था तालुकास्तरावर कार्यरत आहेत. आरोग्य विषयक कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी सदर स्वयंसेवी संस्थेचा सहभाग घेतात. राष्ट्रीय समविकास योजने अंतर्गत ११ स्वयंसेवी संस्थांची निवड करण्यात आलेली आहे.

**TOP**

## ♦ सुधारीत सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनाः-

दारिद्र रेषेखालील योग्य जोडप्याने एक अथवा  दोन मुलीच्या जन्मांनतर शस्त्रक्रिया करुन घेतल्यास त्यांना या योजनेचा लाभ दिला जाते. शस्त्रक्रियेच्या वेळी पती पत्नीचे वयाची अट नाही. पहिल्या मुलीचे जन्माचे वेळी मातेचे वयाची अट नाही  असावे एकच पत्नी असावी एकही मुलगा नको शस्त्रक्रिया शासकीय/ निमशासकीय जिल्हा परिषद दवाखाना अगर मान्यता प्राप्त खाजगी संस्थेत झालेली असावी. अशा पात्र जोडप्यातील प्रत्येक मुलीचे नावे रुपये ४०००/- व एक च मुलगी असल्यास रक्कम रुपये ८,०००/-बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपात  दिले जातात. तसेच शस्त्रक्रिया करुन घेणा-यास रुपये २०००/- देण्यांत येतात.

अहमदनगर जिल्हयात सन २००० पासुन ११७ जोडप्यांना याचा लाभ घेतलेला आहे. सन २००६ - २००७ मधील १० पात्र जोडप्यांना सन २००७-०८ मध्ये १६ लाभार्थी एकुण १४३ लाभार्थिना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

**TOP**

♦ **किडणी, कॅन्सर व हृ-दयरोग अर्थिक मदतः-**

जिल्हा परिषद सेस फंडातुन ग्रामीण भागातील आर्थिक दृष्टया मागासलेल्या रुग्णांना हृदयरोग, किडणी कॅन्सर या दुर्धर आजाराने पिडीत रुग्णांना रुपये ७,००,०००/- इतकी रक्कम खर्च करण्यात येते, त्यात हृदयारोगाने पिडीत असलेल्या रुग्णांना रुपये ७०००/- व कॅन्सर किडणी या रोगाने पिडीत असलेल्या रुग्णंना रुपये ४०००/- मदत देण्यात येते. सन २०० -२०० या आर्थिक वर्षात हृदयरोग शस्त्रक्रिया ------- व किडणी कॅन्सर ----- असे एकुण ------- रुग्णांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

**TOP**

## ♦ तालुका आरोग्य अधिकारी कक्षः-

जिल्हयामध्ये एकुण १४ तालुके असुन ९६ प्रा आ केंद्र व ७७७ उपकेंद्रामार्फत आरोग्य सेवा दिल्या जातात संपुर्ण जिल्हयाचे संनियंत्रण जिल्हातरावरुन करण्यांत येत होते. तालुका स्तरावर प्रभावी यंत्रणा नव्हती शासनाचे मान्यतेने व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम.प्राजक्ता लवंगारे, यांचे मार्गदर्शनाने जिल्हयात माहे जुलै २००४ पासुन सदर कक्षांची स्थापना करण्यांत आली आहे.

तालुका आरोग्य अधिकारी या पदावर तालुक्यातील जेष्ठ वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. पंचायत समिती कार्यालयात तालुका आरोग्य अधिकारी यांचे साठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर कक्षामध्ये विस्तार अधिकारी (आरोग्य)/आरोग्य पर्यवेक्षक ३, आरोग्य सहाय्यक पुरुष १, आरोग्य सहाय्यक महिला १ व कनिष्ठ सहाय्यक १ असे एकुण ६ कर्मचारी नेमण्यांत आलेले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हास्तरावर जी कामे करतात ती सर्व कामे तालुकास्तरावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी करावयाची आहेत. तालुक्यातील आरोग्य विषयक सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे संनियंत्रण करणे तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राने केलेल्या कामाचे अहवाल एकत्रित करुन जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सादर करणे. तालुका आरोग्य अधिकारी कक्षातील मंजुर सर्व कर्मचा-यांना त्यांचे कर्तव्य, जबाबदा-या निश्चीत करण्यात आलेल्या आहे. या कक्षामुळे आरोग्य सेवेची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदतच होणार आहे.

TOP

# जननी सुरक्षा योजनाः-

आक्टोंबर २००५ पासून प्रजनन व बालआरोग्य सोसायटी द्वारा प्राथमिक आरोग्य केंद्रा मार्फत राबविण्यात येते.

१. दारिद्रय रेषेखालील तसेच अनु.जाती, अनु.जमातीतील मातांना लागू आहे.

२. लाभार्थी महिलेचे प्रसवपूर्व नोंदणी करतांना कमीत कमी १९ वय वर्ष असावे.

३. सदर योजनेचा लाभ केवळ दोन जिवंत अपत्या पर्यत राहील.

**देण्यात येणारे लाभः-**

१. ग्रामीण क्षेत्रामध्ये बाळंतपणासाठी शासकीय ग्रामीण आरोग्य संस्थेत लाभार्थी आल्यावर लगेच रुपये ५००/- एक रक्कमी अनुदान लाभार्थीस देणेत येईल तसेच आरोग्य संस्थेत बाळंत झाल्यास रुपये २००/- अतिरिक्त अनुदान सदर लाभार्थीस देणेत येईल.

२. शहरी क्षेत्रामध्ये बाळंतपणाकरिता शासकीय/स्थानिक आरोग्य संस्थेत लाभार्थी आल्यास लाभार्थीस रुपये ५००/- व संस्थेत बाळंत झाल्यास रक्कम रु १००/- अतिरिक्त अनुदान देणेत येईल.

TOP